LOKNETE DR.BALASAHEB VIKHE PATIL. (PADMABHUSHAN AWARDEE) Establishment 4 August 2004
PRAVARA RURAL EDUCATION SOCIETY'S
ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, ALKUTI
ID.No. PU/AN/ACS/78/2004
College code No.757
A/P. Alkuti, Tal. Parner, Dist. Ahmednagar. Pin-414305

- Phone: (02488) 250457 Email ID : Principal.acsalkuti@pravara.in

# Self Study Report : 2023 (1 st Cycle)




## Criteria - 3 Reaserch, Innovation & Extention

## KEY INDICATOR : 3.3 Research Publications and Awards

**3.3.1 Number of research papers per teacher in the Journals notified on UGC website during the last five years**

# Index 2022


| Sr. No. | Title of paper | Name of the author/s | Name of journal | ISSN Number | Page No. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Adivasi Charitratil Sanskrutik Darshan | Kavade K.B. | sanshodhak | 2393-5990 | 3-9 |
| 2. | Boli bhasheche sawardhan : Kalachi Garaj | Kavade K.B. | sanshodhak | 2394-5990 | 10-15 |
| 3. | Prasarmadhyame Ani Samaj Parivartan | Phapale S.R. | sanshodhak | 2394-5990 | 16-22 |

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

वर्ष : ९० • मार्च २०२२ • पुरवणी मराठी विशेषांक ०२





इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

२७. साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा परस्पर सबंध / बाळासाहेब नारायण बोराडे, प्रा.डॉ.वाल्मिक आढावे ..................... १३१
२८. १९९० नंतरच्या मराठी कादंबरीचे कथात्मक जाणीव संदर्भ / प्रा. सुभाष कदम ..................... १३५
२९. शेतकरी आत्महत्या : विशेष संदर्भ धुळे जिल्हा / प्रा.डॉ.संजय पाटील ..................... १३३
३०. अहिराणी भाषिक लोकसमूहाचे भौगोलिक स्थळ व काळानुसार बदलते स्वरूप /डॉ.सदाशिव श्रीराम सुर्यवंशी ..................... १४२
३१. साहित्य, समाज आणि संस्कृती / डॉ.अश्विनी भामरे ..................... १४५
३२. संयुक्त राष्ट्रसंघ आणि महिला सबलीकरण /डॉ. सुवर्णा पंडित सुर्यवंशी ..................... १४९
३३. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांमध्ये असलेल्या वाङ्मयीन अभिरूचीचा अभ्यास/डॉ.तुषार माळी ..................... १५३
३४. कवी वाहरु सोनवणे यांच्या कवितेतून दिसणारे आदिवासी जीवन/ प्रा.पाडवी अनिता, डॉ.माधव कदम ..................... १५८
३५. धुळे शहरातील ख्रिस्ती मिशनरींचे कार्य / प्रा. विजय साळुंखे ..................... १६२
३६. साहित्य, संस्कृती व समाज : परस्परसंबंध / डॉ. मधुचंद्र भुसारे ..................... १६६
३७. राष्ट्रसंत तुकडोजी यांच्या ग्रामगीतेतील सामाजिक व सांस्कृतिक विचार / डॉ.संजय खैरनार ..................... १७०
३८. तंजावरील मराठी लोकांची श्रद्धास्थाने व साहित्य / डॉ. एकनाथ फुटाणे ..................... १७४
३९. आदिवासी चरित्रामधील सांस्कृतिक दर्शन / डॉ. कुंदा कवडे ..................... १७९
४०. खान्देशातील माळी जातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास / श्री. संदिप भदाणे,डॉ.मनिषा कचवे ..................... १८३
४१. सद्यस्थितीतील भारतातील राजकीय संस्कृती / प्रा.डॉ.संदिप नेरकर ..................... १८६
४२. गोपाळ या भटक्या समाजातील लोकगीते / ललिता गोपाळ ..................... १९३
४३. खानदेशातील हाटकर या भटक्या जमातीच्या लोकगीतातून सामाजिक सांस्कृतिक जीवन / प्रा.डॉ.हिरालाल पाटील ..................... १९८
४४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारपृष्ठांवर संपृष्ठ झालेल्या दलित नाटकांचा आशय व आकृतीबंध/प्रा.डॉ.सुधाकर चौधरी .... २०३
४५. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना हिंदी विषय शिकवितांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास / डॉ.गजानन खेकाडे ..................... २०७
४६. स्त्रियांचे सबलीकरण / डॉ.एन.एन.लांडगे ..................... २११
४७. मराठी आदिवासी साहित्य संस्कृती / डॉ.दीपक सूर्यवंशी ..................... २१५
४८. मराठी विज्ञानसाहित्य आणि समाजजीवन / डॉ.विलास धनवे ..................... २१९
४९. मराठा समाजातील महिलांचा राजकीय सहभाग: एक अभ्यास (धुळे जिल्ह्याच्या विशेष संदर्भात)/प्रा.विजय सुर्यवंशी ..................... २२३
५०. ग्रंथालय व्यवस्थापनातील आधुनिक प्रवाह / राहुल जाधव ..................... २२८
५१. साठोत्तरी मराठी साहित्यातील प्रादेशिक प्रवाह : एक शोध / प्रा. सुभाष जयसिंग कदम ..................... २३२
५२. कुणबी–मराठा समाजाची सामाजिक पार्श्वभूमी आणि या समाजातील स्त्रियांचा राजकीय सहभाग /प्रा.डॉ. संतोष एस.खत्री, राकेश भिमराव पाटील ..................... २३६
५३. शिरपूर शहरातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास /डॉ.अरविंद बी.पाटील ..................... २४०
५४. संत एकनाथांच्या प्राणीविषयक भारूडातील लोकतत्त्वे / स्वाती लवंगे, डॉ. दिलीप पवार ..................... २४४

# आदिवासी चरित्रामधील सांस्कृतिक दर्शन

**डॉ. कुंदा बाळासाहेब कवडे.**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी
ता. पारनेर जि . अहमदनगर
पिनकोड : -४१४३०५
मो.नं .९६२३४६३९२९
ईमेलआयडी : -**kavadekunda@gmail.com**

**प्रास्ताविक : –**

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये आदिवासी समाजाने मोठे असे सांस्कृतिक योगदान दिलेले आहे. आदिवासी लोकांचे जगणे यातून सांस्कृतिक दर्शन घडते. याचीही मांडणी विविध चखिलेखनांतून आलेली आहे. आदिवासी समाजात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. या समाजात वेगवेगळे समाजगट आहेत. प्रत्येकाची बोलीभाषाही वेगवेगळी आहे. अनेक जमातीस वेगळी अशी ओळख प्राचीन काळापासून मिळालेली आहे. त्यामुळे आदिवासी जमातीमध्ये सांस्कृतिक वेगळेपण आढळते. आदिवासी बांधव प्राचीन काळापासून 'निसर्ग' या घटकाशी जोडलेला आहे. डोंगर, नद्या, वृक्ष यांशी त्यांचे नाते अतिशय जवळचे आहे. पंचमहाभूतांची पूजा करणारे हे लोक आहेत. त्यांचे जीवन जंगलाशी बांधले गेले आहे. त्यांच्या सांस्कृतिक जीवनात दारू आणि कोंबडीला खास स्थान आहे. तसेच झाडांनाही खास स्थान आहे. म्हणून आदिम काळापासून मानवाच्या संस्कृतीचा मूलाधार असणारा घटक हा भारतीय संस्कृतीचा उगमकर्ता आहे.

**सांस्कृतिक दर्शन:–**

आदिवासी साहित्यामध्ये समाजाच्या संस्कृतीचे दर्शन घडते. याबद्दल धनाजी गुरब म्हणतात, आदिम अवस्थेत राहणारे बहुतेक सर्व समाजगट याच आदिवासी संस्कृतीच्या बातावरणात जगत होते. पाच–सात हजार वर्षांपूर्वी या संस्कृतीला शह देणारी संस्कृती, आपल्या आजच्या आधुनिक स्वकेंद्रित, वर्चस्ववादी, संस्कृतीच्या दिशेने जाणारी संस्कृती युरोपात उदयास आली आणि झपाट्याने जगात पसरली. पुरुषसत्ताक, वर्चस्ववादी असे तिचे वर्णन करता येईल, हा निसर्ग व सजीव सृष्टी तर सोडाच; पण चंद्र, सूर्य, तारे विश्वदेखील ईधराने माणसाकरताच निर्माण केलेले आहे अस आत्मकेंद्री विचार त्याकाळी प्रबळ होता. आदिवासी संस्कृती ह वेगळ्या दृष्टिकोनातून आकाराला आलेली होती. हे केवळ महाराष्ट्रापुरतेच केवळ भारतापुरते वास्तव आहे असे नाही. जगातील अगदी उत्तर ध्रुवावरील व ऑस्ट्रेलियातील जमातीच्या संस्कृतीमध्येही हे एक वेगळे आदिम वैशिष्ट्य आढळते. सर्व आदिवासी जमातीमध्ये समान धागा असलेल्या या जीवनविषयक दृष्टिकोनाच्या आधाराव आदिवासी जीवनशैली आकारास आल्या होत्या. जगातील सर्व आदिवासी संस्कृती त्या आदिम, मानवी संस्कृतीचा वारसा जपत होत्या, जपत आहेत हे लक्षात घेणे गरजेचे आहे.[१] आदिवासी लोकांची संस्कृती ही आदिम मानवाचा वारसा सांगणारी आहे. जुन्या रूढीपरंपरा यांचे जतन करून निसर्गधर्माची शिकवण देणारी आहे, असेच वरील मतावरून स्पष्ट होते.

आदिवासी चरित्र लेखनांमधून समाज बांधवांचे जगणे आविष्कृत होते. त्या जगण्यातून सांस्कृतिक परंपराही सिद्ध होतात. संत मुंगशुजी महाराजांनी आदिवासींमधील श्रद्धांना महत्त्व दिले, तर अंधश्रद्धेविरुद्ध प्रखर हल्ला केला. कर्मकांड, ढोंग, दिखाऊपणा यांच्याविरुद्ध ते जीवनभर लढले. समाजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक विकासात आपल्या काव्याने मोठी भर टाकली.

एक त्यागुनी शिखा सुत्र शेंडी, एक बाढवी जटा
एक तपतो पंचअप्री, एक टांगे उलटा ।
एक मागे द्वारी, कृणा पाप भारी।

कुणी पदर लाबी नाकास रे
ही भेद कसा जगतास । [२]

पृथ्वीवरील सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. प्रत्येकाचे शरीर हे पंचमहाभूतांनी बनलेले आहे. आपण त्यात भेद करणारे कोण आहोत ही शिकवण संत मुंगशुजी वरील काव्यातून देतात. त्यांनी अनेक काव्यातून आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविलेले आहे. आदिवासी समाजात संत मुंगशुजी महाराजांनी जाती-पोटजाती असा कोणताच भेद मानला नाही. गोंड, परधान, थोटी, हलबा हलबी, माडिया, कोलाम, कोरकू आदी सर्व आदिवासी लोक वांशिक व सांस्कृतिकदृष्ट्या एकच आहेत, अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे आदिवासी समाजात सांस्कृतिक एकता निर्माण होण्यास मदत होते.

आदिवासींना शहाणे आणि संघटित करण्यासाठी संत मुंगशुजी महाराज हेजीवनभर धडपडले. समाजाने संस्कृतीचे रक्षण करावे व संघटित व्हावे याबद्दलमुंगशुजी महाराज म्हणतात,

धर्मवेडे होऊनिया। फिरता दिनवान रे ।
समाजात एकी नाही गेला सारा मान रे ।
एकी करता बेकी झाली। दैव्यकळा हाती आली।
आपुलकीची भावना गेला विषय ममता पुढे आली ।
नाही घड तुम्ही अली सुटली सारी घाण रे ।। [३]

सामाजिक भावनेला ग्रासू लागलेली विषमता वरील काव्यातून मुंगजींनी मांडलेली आहे. समाजाच्या सामाजिक दुरावस्थेने ते व्यथित होतात. त्याचप्रमाणे समाजाचा सांस्कृतिक वारसा ठामपणे मांडतात. आदिवासी समाज संस्कृतीच्या धाग्याने बांधला जाऊ शकतो, अशी त्यांची धारणा होती, म्हणून सांस्कृतिक ऐक्यासाठी त्यांनी काव्यरचना केली.

डॉ. विनायक तुमराम यांनी 'गोंडवनातील क्रांतिवीर नारायणसिंह उईके यांच्या चरित्रामध्ये आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविले आहे. डॉ. विनायक तुमराम म्हणतात, आदिवासी म्हणजे संस्कृतीचे देणे असलेला मानव समूह होय. संस्कृतीच्या भक्कम पायावरच आदिवासी जीवनाची इमारत शतकानुशतके तम परून राहिलेली आहे. रानावनांच्या डोंगरदऱ्याच्याआसन्यालाराहिलेला, आर्य आदिवासींचा समुदाय कित्येक शतके लोटून गेलीत, मात्र आपले अस्तित्व टिकवून आहे. कित्येक वादळी सामाजिक परिवर्तने झालीत. मात्र हे जीवन अविचल राहिले आहे. सामाजिक एकात्मता काळाच्या प्रवाहात अभंग राहिली आहे. समान देवदेवतांना मानणारा, समान धर्म आणि संस्कृतीला अंगिकारणारा व समाज दुःख समस्यांना गांजलेला हा समाज आपल्या जीवनमूल्यांना जीवाच्या मोलाने आजही जपतो आहे. या जीवनामागील प्रेरणा कोणती असावी हा प्रश्न उद्भवणेस्वाभाविक आहे. संस्कृतीफ हाच या जीवनाचा आधार व प्रेरणास्त्रोत होय.४ डॉ. विनायक तुमराम यांचे मत आदिवासी संस्कृतीबाबत अगदी योग्य आहे. कारण आदिवासी संस्कृती ही भूमीतील आद्य संस्कृती होय. हे लोक या भूमीचे मूळनिवासी आहेत. मानवाचा सामाजिक आणि राजकीय इतिहास यांचा उदय होण्यापूर्वी या भूमीवर उत्तम संस्कृती नांदत होती. ती संस्कृती आदिवासी लोकांची होती हे आपणास ज्ञात आहेच. त्यांच्या बोलीभाषा, लिपी, कला, देव-देवता यांनी आपणास चांगल्या प्रकारे आदर्श घालून दिलेला आहे.

चरित्रलेखनातून संस्कृतीचे रक्षण करण्याचा संदेश चरित्रनायकांनी आणिक्रांतीकारकांनी दिलेला आहे. त्याचप्रमाणे वाईट प्रथा यांचे निर्मूलन व्हावे यासाठीही प्रयत्न केलेले राजा केरळ वर्मा यांनी दिलेला संदेश चरित्रामधून येतो, आपली महान परंपरा आणि संस्कृतीचे रक्षण करा. तिला इंग्रजांपासून वाचवा.५ असा संदेश आदिवासींना दिलेला आहे. जीवनात परंपरा आणि संस्कृती किती महत्त्वाची आहे हे यातून आपल्यासमोर येते. बिरसा मुंडाने तर सांस्कृतिक परंपरा कायम टिकावी, म्हणून बिरसा घरमची स्थापना केली होती. आपल्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक चळवळींमधून बिरसाने आदिवासी समाजामध्ये मानाचे स्थान निर्माण केले होते. त्याने जनतेला नवा धर्म दिला होता. बिरसा घरमफ यातून त्याने नवी संस्कृती निर्माण केली होती. त्याचा धर्म निसर्गवादी होता. निसर्ग हा मानवी जीवनातील महत्त्वाचा घटक आहे. हा नवाजीवन मंत्र त्याने समाजाला दिला होता.

वीरबापूराव शेडमाके यांची तर भारतमातेच्या गौरवी इतिहासावर फार अपार श्रद्धा होती. धर्म, संस्कृती यांच्यावर त्यांचा विश्वास होता. आपल्या आयुष्यात त्यांनी विविध चर्चासत्र, अभ्यासवर्ग, अस्मितादर्शन मेळावे घेतले. शाळा महाविद्यालये येथे जाऊन धर्म, संस्कृती यांची शिकवण दिली होती. आदिवासी समाजामध्ये नवचेतना

जागृत करण्याचे काम बिरसा मुंडा व बापूराव शेडमाके यांनी केले होते. आपल्या संस्कृतीचे आणि धर्माच्या रक्षणासाठी इंग्रजी फौजला कापून काढण्याची प्रतिज्ञा वीर बापूराव शेडमाके यांनी घेतली होती. या चरित्राबद्दल चरित्रलेखनातील मजकूर याप्रमाणे, इंग्रजी फौजेला कापून काढण्याची शपथघेतलेल्या आपल्या सैनिकांसमोर वीर बाबूराव म्हणाले, भारत मातेच्या पराक्रमी सुपुत्रांनो, आतंदवादी इंग्रजांनी आपल्या स्वराज्यावर व धर्मसंस्कृतीवर आक्रमण केले आहे. ते तुम्हाला खिश्चन बनविण्याचा प्रयत्न करीत आहेत. आम्ही शिवाजीचे वंशज आहोत. महाराणी दुर्गावतीचे वंशज आहोत. महाराणी दुर्गावतीने अकबराच्या प्रचंड फौजेशी युद्ध केले व आपल्या प्राणाची आहुती दिली. शत्रूशी लढताना प्राणाची आहुती देणे, हे वीरमरण आहे. आम्ही सैनिक सदैव याच क्षणाची वाट पाहत असतो. तो क्षण आता जवळ आला आहे. गोया चामडीचा एकही इंग्रज आता जिवंत राहणार नाही ही प्रतिज्ञा करा व शत्रूवर तुटून पड़ा.५ हा चरित्रलेखनातून आलेला संदेश वीरपरंपरा निर्माण करणारा आहे. स्वधर्मांचे रक्षण करणे, म्हणजे संस्कृतीचे रक्षण करा, असे बापूराव शेडमाके म्हणतात असेही आपल्या लक्षात येते.

आदिवासी समाजाचे लोकजीवन आणि त्यांची संस्कृती हा सामाजिक दस्तऐवज आहे. त्यांचा सांस्कृतिक विकास म्हणजे समाजविकास होय, याचीही ओळख आपल्याला चरित्रलेखनातून होते. त्यांची बोलीभाषा, राहणीमान रूढीपरंपरा, देवदेवता, कलाकौशल्य यातून त्यांची जीवनमूल्ये विकसित होत गेलेली आहे. आदिवासी संस्कृतीच्या विकासाची पंडित नेहरू यांनी सांगितलेली पाच तत्वे लेखक वीरसिंग पाडवी यांनी मदशरीबेनन यांच्या चरित्रात सांगितली आहेत ती याप्रमाणे, १) आदिवासींचा विकास त्यांच्या कलाने व्हावा, त्यांच्यावर बळजबरी केली जाऊ नये, त्यांच्या पारंपरिक कला व संस्कृतीस जपून प्रोत्साहन दिले पाहिजे. २) जमीन व जंगलावरील त्यांचे हक सर्वमान्य असावेत. ३) आदिवासींमधून त्यांचा राज्यकारभार व विकास कामासाठी प्रशिक्षित व अधिकारी व्यक्तींचे जाळे तयार करावे, प्रदेशात बिगर आदिवासींना जाण्यास मज्जाव असावा. ४) त्यांच्यावर प्रशासकीय अधिकारांचा जास्त वापर न करता, तसेच त्यांच्यावर योजनांचा भडिमार करणे उपयोगाचे नाही. त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक संस्था विरोधी न जाता, त्यांच्या माध्यमातून आपण कार्य केले पाहिजे. ५) योजनांवर खर्च केलेले आकडेवारीतून आपण परिणामांचे मापदंड निश्चि[…] करता त्यांच्या समाज व्यक्तिमत्त्वाच्या मूल्यनिर्धारणेवरून नि[…] केले जावे.६ पंडित नेहरू यांनीआदिवासी संस्कृतीचे विकासा[…] धोरण वरील पंचशील तत्त्वामधून राबविले होते. पुढील काळा[…] तत्व निश्चितच प्रेरणादायी ठरलेले आहे.

'आदिवासी महानायकांचे चरित्र' या ग्रंथात शेषराव एन. म[…] यांनी आदिवासींच्या अनेक कुळांचा परिचय करून दिलेला अ[…] आदिवासी कुळांना सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त झालेले अ[…] याबद्दल चरित्रलेखक शेषराव एन. मडावी म्हणतात, आदिवासींम[…] अनेक कुळे आहेत. त्यातील प्रत्येक समूह एकाला पूर्वज मा[…] त्यांच्या नेतृत्वाखाली कार्य करतात. पुढे तेच कुळप्रमुख कार्यकर्त[…] चार पाच सहा व सात असे संघ म्हणजे समूह निर्माण झाले[…] त्यामध्ये ही कुळे विभागण्यात आली. त्यामुळे त्याला बंधु[…] समूह असे म्हणतात.. त्यामुळे त्याला चार पाच सहा बंधूचा समू[…] सात बंधूंचा समूह, यालाच पुढे चार, पाच, सहा सात देव अ[…] संबोधण्यात आले असावे. गणपद्धती आदिवासी संस्कृतीची निर्मि[…] होती. प्रत्येक गणाचे कुळ, वंश वेगवेगळे होते. ते वृक्षांना, पक्ष्यां[…] पशूना आपले कुलचिन्ह वंश / पूर्वज मानत असत. ते त्[…] कुलचिन्हाची पूजा करत होते. त्याच कुळाच्या नावाने पुढे ओळखल[…] जाऊ लागल्या.७ आदिवासी समाजामध्ये कुळांना परंपरादृष्[…] अतिशय महत्व आहे. वृक्ष, पशु आणि पक्षी यांना त्यांच[…] संस्कृतीमध्ये मानाचे स्थान आहे. आदिवासी समाजामध्ये आडना[…] सांगण्याची संस्कृती या समाजामध्ये आहे, असेही आढळून येते.

राणी हिराईने महाकालीची निर्मिती करून सांस्कृतिक वैभवा[…] भर घातली. त्याचप्रमाणे आदिवासी समाजामध्ये स्थानदैवतेह[…] महत्त्वाची मानली जातात. त्यांच्या दैवतांना कोंबडे, बकरे यांच[…] नैवेद्य लागतो. मोठ्या प्रमाणात या दैवतांच्या यात्रा हे लोक उत्सवा[…] साजरा करतात यावेही वर्णन चरित्रलेखनामधून येते. आदिवासी[…] समाजबांधव एकत्र यावा, आनंदाने उत्सव साजरा करावा हा या[…] रूढीपरंपरांचा उद्देश आहे. बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजात[…] सांस्कृतिक वैभव वाढीस लागावे यासाठी प्रयत्न केलेले आहे. याबद्दल त्यांच्या चरित्रामध्ये लेखक शेषराव एन. मडावी वर्णन[…] करतात, आपल्या समाजबांधवास एकत्रित आणून त्यांच्यात[…] आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम बिरसा मुंडाने केले. बिरसाच्या[…]

लक्षात आले की आपला समाजबांधव धर्माच्या पाशात सापडला आहे. त्यामुळे संस्कृतीचाविनाश अटळ आहे, म्हणून त्याने संस्कृतीच्या पुनर्स्थापनेसाठी निसर्गाला आपला धर्म मानले. पर्यायी त्याने निसर्गधर्माचे अवलंबन करून संस्कृती रक्षण केले. बिरसा धर्म मानणाऱ्या प्रत्येकांनी आपल्या घरासमोर तुळस लावली. ८ यावरून आपणास असे लक्षात येते की, निसर्गाची पूजा करणे ही आदिवासी समाजाची आद्य संस्कृती होय. अनेक सामाजिक मूल्यांची जोपासना यातून त्यांनी केली. असेही म्हणता येते.

आदिवासी चरित्रलेखनातून आलेली संस्कृती ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. आदिवासींच्या रूढी, परंपरा, सण, उत्सव हे पर्यावरणाशी निगडित आहेत. त्याचा हे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ठसा चरित्रांमधून आपल्या मनावर उमटतो. त्यांच्या सामाजिक चालीरीती, धार्मिक सण, उत्सव, यात्रा या सांस्कृतिक जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या अशाच आहेत. विविध देवदेवतांना आदिवासी जनमानसात मानाचे स्थान आहे. सुखप्रसंगी हे लोक आनंदाने नाचतात. देवदेवतांची गाणी गातात. मनोभावे देवाची पूजा, प्रार्थना करतात. देवतांना प्रसन्न करण्यासाठी मांसाहारी नैवेद्य दाखवितात. त्याबरोबर दारूही अर्पण करतात, एकूणच आदिवासी चित्रणांमधून येणारे सांस्कृतिक वैभव है अनमोल असेच आलेले आहे.

आदिवासींच्या संस्कृतीची घडण अगदी साधी आहे. काही विनामूल्य व सुलभतने मिळते. त्यावर ते आपल्या चालीरीती, हौसमौज व उत्सव समारंभ भागवून घेतात. बहुतेक सर्व आदिवासींना विस्तव तयार करणे, हत्यारे तयार करणे, घरे बांधणे, मातीची भांडी बनविणे, लाकूडकाम करणे, वस्त्र विणणे इत्यादी कला अवगत आहेत.

**सारांश-:**

भारतीय समाजव्यवस्थेतील संस्कृतीमध्ये आदिवासी समाजाचे मोठे योगदान लाभलेले आहे. हे आदिवासी चरित्रांच्या अभ्यासाने स्पष्ट होते.भारतीय संस्कृतीचा उगम मुळात आदिवासी लोकांपासून झालेला आहे, असेही येथे स्पष्ट होते. आदिवासी संस्कृती ही जगात श्रेष्ठ ठरलेली आहे, असेही चरित्रलेखातून आढळून येते. समाजात सांस्कृतिक एकता निर्माण करण्यासाठी आदिवासी संस्कृती ही प्रेरणादायक ठरते, असेही सिद्ध होते. आदिवासीलोक हे संस्कृतीचे महानपूजक आहेत. निसर्गाचे दान त्यांच्या संस्कृतीला लाभलेले आहे, असेही चरित्रलेखनातून आढळून येते. आदिवासी लोकजीवनाचा खरा आधार व प्रेरणास्त्रोत याची संस्कृती आहे,. समस्त भारतीय लोकांसाठी दिशादर्शक आणिप्रेरणादायी आहे.

**संदर्भ : -**

१)'आदिवासी साहित्य', गुरव धनाजी, बाङ्मय सेवा प्रकाशन, नाशिक रोड,प्रथमावृत्ती २००८, पृ.क्र. ३३.

२)संत मुंगशुजी : एक कृतिशील तपस्वी,तुमराम (डॉ) विनायक, मुद्रण भूषण, म. बनहट्टी, नागपूर, प्रथमावृत्ती १९८८, पृ.क्र. ७.

३)) संत मुंगशुजी : एक कृतिशील तपस्वी, उनि., पू.क्र. ५०.

४)गोंडवनातील क्रांतिवीर नारायणसिंह उईके, तुमराम (डॉ) विनायक, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, द्वितीय आवृत्ती २०११, पृ.क्र. ११७.

५) स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी क्रांतिकारक,, गारे (डॉ) गोविंद, श्रीविद्याप्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००४ ,पृ.क्र. २१.

६)१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यातील विदर्भातील 'क्रांतिवीर वीरबापूराव पुल्लेसूरशेडमाके' घाडगे अशोक गणपतराव, श्री भारती प्रकाशन, नागपूर,द्वितीय आवृत्ती २००५, पृ.क्र. २२.

७)स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी वीरस्त्री दशरीवेन, पाडवी वीरसिंग, प्रकाशक- रेखा पाडवी, नंदुरबार, पृ.क्र.६

८)आदिवासी महानायकांचे चरित्र, महावी शेषराव एन. सुधीर प्रकाशन, वर्धा, प्रथमावृत्ती २०१५, पृ.क्र.१४.

*-*-*

RNI No.MAHMAR 44528:30/03/2014

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

## विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या दुर्मिळ ग्रंथांची यादी

☎: (०२५६२) २३३८४८

| अ.न. | पुस्तकाचे नांव | किंमत रुपये |
|---|---|---|
| १) | छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे | ३५० |
| २) | शिवाजीची राजनिति | ४५० |
| ३) | राजवाडे चरित्र | ७०० |
| ४) | इ.वि.का.राजवाडे समग्र साहित्य (खंड ४ ते १०) ३५० × ६ | २१०० |
| ५) | मराठ्यांच्या इतिहासाची साधने (खंड १ ते ११) ४०० × ११ | ४४०० |
| ६) | The Sources of Maratha History ५ खंड ६०० × ५ | ३००० |
| ७) | गीताई धर्मसार | ५० |
| ८) | जागतिक बालक वर्षानिमित्त | २५ |
| ९) | अमृतानुभव | १०० |
| १०) | कॅटलॉग | ५० |
| ११) | नागपुरकर भोसल्यांचे चिटणीशी बयान् | ५० |
| १२) | संशोधक-काँग्रेस शताब्दी विशेषांक | ५० |
| १३) | ज्ञानेश्वर नितीकथा | २० |
| १४) | विलासमणि मंजिरी | १०० |
| १५) | योगचिंतामणी | १०० |
| १६) | वेडिया नागेश | २५ |
| १७) | नवरस रागमाला (संशोधक) | ५० |
| १८) | तात्या जोगाच्या चरित्राची साधने | १०० |
| १९) | जानकी स्वयंवर | १०० |
| २०) | खानदेश माळव्याच्या इतिहासाची साधने | १५० |
| २१) | दुर्मिळ संच (संशोधक) | २००० |
| २२) | निबंधसंग्रह -१ | ८० |
| २३) | निरुक्त | १५०० |
| २४) | नागपूर राज्याच्या इतिहासाची साधने | २५० |
| २५) | मराठाकालीन शासन व्यवस्था आणि स्थित्यंतरे | १५० |

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९० • डिसेंबर २०२२ • पुरवणी विशेषांक १३

आज़ादी का अमृत महोत्सव

इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
# या संस्थेचे त्रैमासिक

# ॥ संशोधक ॥

**पुरवणी अंक १३ – डिसेंबर २०२२ (त्रैमासिक)**

- शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणी अंक : १३

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे ● प्रा. डॉ. मृदुला वर्मा ● प्रा. श्रीपाद नांदेडकर

**✸ प्रकाशक ✸**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/–
वार्षिक वर्गणी रु. ५००/–, आजीव वर्गणी रु. ५०००/– (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे–माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

४३. आर्थिक वृद्धी आणि शाश्वत आर्थिक विकास

– मोरेश्वर भिकाजी शेन्डे ---------- २१५

४४. ग्रामीण जीवन कवी मनातील शेतकरी

– डॉ. संजय जनार्दन आगलावे ---------- २१७

४५. नागपुरी बोली : एक भाषाशास्त्रीय अभ्यास

– डॉ. वैजयंती पेशवे ---------- २२०

४६. भटक्या–विमुक्त जाती–जमातींची जातपंचायत व स्त्रिया : एक अभ्यास

– सौ. अनुराधा प्रशांत पवार (गोरे) ---------- २२४

४७. भारतीय शेती आणि शेतकऱ्यांची आजची स्थीती एक विश्लेषनात्मक अध्ययन

– प्रा. डॉ. प्रशांत रा. देशमुख ---------- २२८

४८. सोलापूर जिल्ह्याच्या शेती विकासात 'मागेल त्याला शेततळे' योजनेचे योगदान

– संतोष अर्जुन शिंदे, डॉ. सत्यम काकासाहेब सानप ---------- २३२

४९. सर्वसमावेशक वृद्धीची आवश्यकता

– सहा. प्रा. कैलास सत्यवान शेलार, प्रा. (डॉ.) आदिनाथ मोरे ---------- २३६

५०. औद्योगिक क्षेत्रातील प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास – विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा

– डॉ. विशाल भाऊसाहेब पावसे, वैशाली दिनकर कानवडे ---------- २४०

५१. महाराष्ट्रातील ऊसतोड कामगारांच्या समस्या

– डॉ. शरद बाबुराव सोनवणे ---------- २४४

५२. बोली भाषेचे संवर्धन : काळाची गरज

– डॉ.कुंदा बाळासाहेब कवडे ---------- २४८

५३. भारतातील नैसर्गिक आपत्ती : महापूर

– डॉ.अनिल विजय शितोळे, महेशकुमार विष्णू साळुंखे ---------- २५०

५४. आधुनिक कालखंडातील इतिहास लेखनाची वैशिष्ट्ये

– प्रा. वटाणे कल्याण राजेंद्र ---------- २५६

५५. कृषी योजनांची शेतकऱ्यांच्या विकासात भुमिका

– डॉ. मनोज श्रीकृष्णराव पवार ---------- २५८

५६. कृषी विपणन आणि कृषी अर्थशास्त्राचे देशाच्या विकासातील योगदान

– डॉ मृणाल रविकांत वलीवकर ---------- २६२

५७. राजकारणातील महिला आरक्षण आणि महाराष्ट्रातील महिलांचा राजकारणातील प्रत्यक्ष सहभाग

– प्रा.पेंडभाजे प्रियंका भाऊसाहेब ---------- २६६

# बोली भाषेचे संवर्धन : काळाची गरज

**डॉ.कुंदा बाळासाहेब कवडे**
मराठी विभागप्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अळकुटी,
ता. पारनेर जि. अहमदनगर
Email- kavadekunda@gmail.com

आपल्या मनातील विचार दुसऱ्याला कळावेत म्हणून भाषेचा वापर आपण करत असतो.'व्यक्ती तितक्या प्रकृती' या म्हणी प्रमाणे जितक्या व्यक्ती तितक्या भाषा बोलल्या जातात.आपण जेव्हा तोंडाने बोलतो तेव्हा आपल्याला काय सांगायचे हे दुसऱ्याला समजू शकते. जी भाषा आपण बोलतो ती नेहमीच्याच बोलण्यातील असते तिलाच आपण बोली म्हणतो. बोली बोलणारी व्यक्ती साक्षर असतेच असे नाही. परंतु देखील साक्षर नसूनही ती आपल्या मनातले विचार व्यक्त करत असते. आपल्याला जे काही सांगायचे ते दुसऱ्यापर्यंत पोहचविते. म्हणून बोली ही सामान्य माणसांची, निरक्षरांची व समूहनिष्ठ असते. ती सामूहिक स्वरूपाची असते.तिचे स्वरूप सोपे असून व्याकरणाचे, शुद्धलेखनाचे, कोशाचे नियम तिला लावता येत नाही. भाषा ही आपल्या जीवनाचा महत्वपूर्ण भाग असते.कोणतीही भाषा संस्कृतीचा भाग असते. एक भाषा तयार होण्यासाठी हजारो वर्ष जात असतात. त्या भाषेसाठी कितीतरी परिश्रम आपल्या पूर्वजांनी घेतले आहेत. कोणतीही बोली आपल्या दैनंदिन जीवनात बोलायला हवी, परंतु प्रत्यक्षात तसे होत नाही. त्यामुळे हजारो वर्षाचा इतिहास आपण अज्ञानामुळे भाषा न बोलल्यामुळे आपण भाषा नष्ट करत असतो. कोणतीही भाषा समाजाची बहुमुल्य संपत्ती आहे. कोणताही समाज टिकवायचा असल तर आपल्याला संस्कृती टिकवावी लागेल. संस्कृती टिकविण्यासाठी आपली बोली भाषा टिकवावी लागेल. मराठीतील प्रमाणभाषा ही शिक्षणाची भाषा म्हणून मान्य आहे. मराठीच्या विविध बोली या मराठीची विविध रूपे आहेत. दैनंदिन व्यवहार याच बोलीतून करतो. माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे जगभरच्या बोली भाषा मृत्यूपंथाला लागतील, असे भाषावैज्ञानिक सांगत आहेत. या बोलीभाषांच्या संवर्धनासाठी 'युनेस्को'ने योजना तयार केली आहे. केंद्र सरकारने काही उपाययोजना केल्या आहेत. या मलमपट्ट्या आहेत. प्रत्येक भाषेच्या अस्तित्वासाठी तिला प्रथम शिक्षणाची आणि राज्यकारभाराची भाषा बनावी लागते. प्रत्येक भाषेत ही क्षमता असते. त्यासाठी भाषेचा विकास करावा लागतो. भाषेची समृद्धी ही तिच्या शब्दसंपत्तीवर अवलंबून असते. मराठीने अनेक परकी भाषांतून शब्दसंपत्ती घेतली आहे. त्याच वेळी आपल्याच भाषेची वेगवेगळी रूपे असलेल्या बोलीतून शब्द आला, की त्याला अशुद्ध रूप ठरविले आहे.

मराठीचा विकास करण्यासाठी प्रथम प्रमाणभाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा लागेल. त्यासाठी आज जे 'बोली भाषेकडून प्रमाणभाषेकडे' असे ठोकून घोळून घेतले जात आहे, यातून मराठीचे संवर्धन होणार नाही. मराठी संकुचित बनण्याचाही मोठा धोका आहे. प्रमाणभाषा ही अभिजनांचीच भाषा न बनता ती बहुजनांच्या बोलीतील शब्द स्वीकारून भाषेचे प्रमाणीकरण केले पाहिजे. ज्ञानाच्या व्यवहारासाठी प्रमाणीकरणाची गरज असते. ही प्रक्रिया मराठीत झाली नाही. बोलीतून ललित साहित्याची निर्मिती झाली. कारण कलाकाराला उत्स्फूर्त कलाविष्कारासाठी त्याखेरीज पर्याय असत नाही. कलाकार हा बंडखोर असतो. त्यामुळेच रवींद्रनाथ टागोरांना व्याकरणाचे नियम ठाऊक नाहीत, असे विद्वान म्हणू लागले, तेव्हा टागोरांनी सांगितले, इलोक जसे बोलतात तसे मी लिहितोफ आपल्या संतांनीही हेच केले. त्यामुळे संतांचे साहित्य निरक्षरांनाही मुखोद्गत असते. कारण लोकांच्या जगण्याची भाषा त्यांनी वापरली. मराठी भाषा, तिच्या विविध बोलीभाषा आणि आदिवासी भाषेच्या संवर्धनासाठी काही उपाय सुचविले गेले आहेत. एक तर शिक्षणाची भाषा म्हणून ज्ञान भाषा म्हणून स्थान मिळाल्याखेरीज कोणत्याही भाषेचे संवर्धन होणार नाही. एकतर बोलीकडून प्रमाणभाषेकडे हा प्रचार आहे, तो तातडीने थांबवावा लागेल. यातून बोली मारल्या जाणार आहेत. बोली याही भाषाच आहेत, त्यांना जिवंत ठेवायचे आहे.

भाषेच्या विकासासाठी शासकीय पातळीवर काही प्रयत्न सुरू आहेत. जनतेतील जागृती ही ही महत्त्वाची आहे. आदिवासींच्या ज्या बोली आहेत, त्या मराठीच्या रूपाप्रमाणे नाहीत, तरी मराठीचे तिच्यावर काही संस्कार आहेत. कोरकूसारख्या बोलीत फारच कमी शब्दसंख्या आहे. आपल्या आविष्कारासाठी त्यांना कमी शब्दांचीच गरज वाटते. आदिवासी

ISSN No. 2394-5990

मुलांना आदिवासी बोलीतूनच शिक्षण द्यावे, असा विचार मांडणारे काही आहेत. त्यामुळे आपण मागे पडू ही भीती आदिवासींनाही वाटते. त्यामुळे आदिवासीतून शिक्षणाला आदिवासींमधीलच काहींचा विरोध आहे. मराठीच्या जवळजवळ पन्नास बोली भाषा आहेत. त्यात प्रादेशिक छटाही आहेत. त्यामुळे या वेगवेगळ्या प्रादेशिक छटांकडे भाषेचे सौंदर्य म्हणूनच पाहिले पाहिजे. कारण त्यात नैसर्गिकता आहे. काही महत्त्वाच्या बोली आणि आदिवासी बोलीच्या संवर्धनासाठी, या भाषांना ज्ञानाच्या व्यवहाराची भाषा बनविण्यासाठी या भाषांचे अभ्यासक्रम विद्यापीठांना विकसित करता येतील. केवळ त्या बोलीतील त्याच भाषेतून शिक्षण घ्यावे, यातून त्यांच्यात भाषिक न्यूनगंड निर्माण होऊ शकतो. यामुळे आपण मुख्य प्रवाहापासून दूर राहू ही भीती वाटू शकते. या बोलीचा प्रसार हा व्यापक रीतीने झाल्यास त्यांना प्रतिष्ठा मिळेल. आता शिक्षण लवचिक झाले आहे. वेगवेगळ्या भाषा शिकण्याकडे कल वाढत आहे. यामागे व्यावहारिक हेतू असला, तरी आवड आणि छंद म्हणूनही भाषा शिकणारा मोठा वर्ग आहे. इंग्रजीमुळे मराठी भाषा धोक्यात आली आहे, हा विचार सोडून मराठीतून सर्व ज्ञानशाखांतून अभ्यासक्रम विकसित करून, त्यातून कौशल्य प्राप्त केले पाहिजे. आपण आधुनिक कौशल्य प्राप्त केले आहे काय हा मूलभूत प्रश्न आहे. त्यासाठी कोणत्याही भाषेची क्षमता ही विज्ञान-तंत्रज्ञानाची भाषा बनण्याची असते. त्यासाठी भाषा लवचिक असावी लागते. आपल्या भाषेत सामावून घेण्यासाठी मानसिकताही ठेवली पाहिजे. आपल्या भाषेत तो शब्द येताना जसाच्या तसा आला पाहिजे, असे नाही, तर आपल्या भाषेच्या प्रकृतीप्रमाणे तो आला पाहिजे. 'मँचेस्टर कॉटन' हा शब्द आपल्या ग्रामीण जनतेने 'मांजरपाट' असा करूनच भाषिक व्यवहारात सामावून घेतला.

मराठी ही जगातील एक प्रमुख भाषा आहे. तिच्या उज्ज्वल भवितव्यासाठी तिला ज्ञान-विज्ञानाची भाषा बनवताना, बोलींनाही जिवंत ठेवण्यासाठी त्यांच्या विकासाचा कार्यक्रमही आखला पाहिजे. 'बोलीकडून प्रमाण भाषेकडे' या दृष्टिकोनामुळे बोली नष्ट होणार आहे. तेव्हा बोली नष्ट न करता मराठी समृद्ध बनली पाहिजे. भाषेचे संवर्धन करण्यासाठी सर्वप्रथम आपण आपल्या घरात आपल्या भाषेतून संवाद साधला पाहिजे. समाज माध्यमावर किंवा इतर ठिकाणी आपल्या भाषेतुनच लखन करायला हवे.अनेक चांगल्या चांगल्या पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. वेगळ्या भाषेत वाचन करून त्याचे भाषांतर केले पाहिजे. आपल्या आवती-भोवती रोजच्या व्यवहारात भाषेचा वापर असायला हवा.आपल्या मोबाईलवर आपण मराठी भाषेतून संवाद साधताना किंवा टंकलेखन करताना 'गुगल इंडिक किबोर्ड' ॲप असायला हवे. आपली बोलीभाषा टिकविण्यासाठी आपणच प्रयत्न केले पाहिजे.

**निष्कर्ष :**

- कोणत्याही बोली भाषेचा अभ्यास करताना स्वयंसेवकाची भूमिका महत्त्वाची असते.
- बोली भाषा बोलणारा समाजात मिसळणे महत्त्वाचे असते.
- बोलींची माहिती घेणे गरजेचे असते.
- बोलींचा अभ्यास करून संशोधनात्मक कार्य करण्याची गरज.
- बोलीभाषा हे समाज जीवनाचे अंग व दैनंदिन व्यवहाराचे साधन, संस्कृतीचे वहन म्हणून बोलींचे संवर्धन करणे गरजेचे आहे. तरच आपली बोलीभाषा टिकेल.

**सारांश :**

बोली कोणतीही असो, ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. कोणतीच बोली ही नष्ट होत नाही. व्यक्ती आपल्या व्यापक व्यवहारासाठी सर्व समाजाने प्रमाणभूत मानलेली भाषा वापरते, आणि इतर वेळी आपल्या मर्यादित परंपरागत स्थानिक बोलींचाच उपयोग करते. म्हणून कोणतीही बोली सहजासहजी नष्ट होत नाही. ती दैनंदिन व्यवहारातले नैसर्गिक साधन असते. ती मौखिक स्वरूपात जिवंत असते.

**संदर्भ ग्रंथ सुची :**


१) https://pratisaad.blogspot.com : बोली भाषांच्या संवर्धनासाठी...इरगोंडा पाटील यांचा लेख
२) marathimati.com https://www.marathimati.com : mar..
३) dainikprabhat.com
४) https://www.dainikprabhat.com : m...
५) मराठी भाषा संवर्धन : काळाची गरज - Dainik Prabhat
६) mr.m.wikipedia.org
७) https://mr.m.wikipedia.org : wiki
८) https://www.vishwamarathiparishad.org : ...
९) मराठी भाषा संवर्धन काळाची गरज - Vishwa Marathi Parishad
१०) संशोधनाच्या नव्या दिशा,प्रा डॉ.माहेश्वरी गावित,पॉवर ऑफ नॉलेज प्रकाशन,विशेषांक एप्रिल २०१८.
११) भाषा आणि भाषाव्यवहार, अशोक केळकर, मॅजेस्टीक प्रकाशन ' मुंबई, प्रथमावृत्ती १९८३.


■■■

RNI No.MAHMAR 44528:30/03/2014

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

## विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या दुर्मिळ ग्रंथांची यादी

☎: (०२५६२) २३३८४८

| अ.न. | पुस्तकाचे नांव | किंमत रुपये |
|---|---|---|
| १) | छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे | ३५० |
| २) | शिवाजीची राजनिति | ४५० |
| ३) | राजवाडे चरित्र | ७०० |
| ४) | इ.वि.का.राजवाडे समग्र साहित्य (खंड ४ ते १०) ३५० × ६ | २१०० |
| ५) | मराठ्यांच्या इतिहासाची साधने (खंड १ ते ११) ४०० × ११ | ४४०० |
| ६) | The Sources of Maratha History ५ खंड ६०० × ५ | ३००० |
| ७) | गीताई धर्मसार | ५० |
| ८) | जागतिक बालक वर्षानिमित्त | २५ |
| ९) | अमृतानुभव | १०० |
| १०) | कॅटलॉग | ५० |
| ११) | नागपुरकर भोसल्यांचे चिटणीशी बयान् | ५० |
| १२) | संशोधक-काँग्रेस शताब्दी विशेषांक | ५० |
| १३) | ज्ञानेश्वर नितीकथा | २० |
| १४) | कमाविसदार | ४०० |
| १५) | योगचिंतामणी | १०० |
| १६) | वेडिया नागेश | २५ |
| १७) | नवरस रागमाला (संशोधक) | ५० |
| १८) | तात्या जोगाच्या चरित्राची साधने | १०० |
| १९) | मोडीलीपी परिचय | २०० |
| २०) | खानदेश माळव्याच्या इतिहासाची साधने | १५० |
| २१) | दुर्मिळ संच (संशोधक) | ३००० |
| २२) | निरुक्त | २००० |
| २३) | नागपूर राज्याच्या इतिहासाची साधने | २५० |
| २४) | मराठाकालीन शासन व्यवस्था आणि स्थित्यंतरे | १५० |

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९० • डिसेंबर २०२२ • पुरवणी विशेषांक १३

## आज़ादी का अमृत महोत्सव

इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

६९ मराठी साहित्यातील अनुवादित कथा - प्रा. जान्हवी कराळे, नाशिक ---------------- २७१

७० समाजाने केलेली विधुर क्रांती (१६ ऑगस्ट १९४२) - डॉ. कैलास भांडारकर, गडचिरोली ---- २७५

७१ डॉ. विलास संघवीलिक लिखित योगसाहित्याचा चिकित्सात्मक अभ्यास
- १) डॉ. गणेश बाग, नाशिक, २) डॉ. जितेंद्रकुमार माळी ---------------------- २८०

७२ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रसार माध्यमांविषयी असलेल्या जाणीव जागृतीचा अभ्यास.
- डॉ. गजानन खैरनार, शिरपूर, जि. धुळे -------------------------------- २८४

७३ प्रसारमाध्यमे आणि त्यातील करीयरच्या संधी
- डॉ. संदीप माळी, मुक्ताईनगर, जि. जळगाव -------------------------------- २८८

७४ साहित्य, संस्कृती, समाज आणि मराठी विज्ञानसाहित्य यांचा परस्पर संबंध (मराठी विज्ञानकादंबरी संदर्भात) - १) डॉ. संजय शिंदे, नंदुरबार ; २) डॉ. दिलीप पवार, सटाणा, ता. बागलाण, जि. नाशिक २९३

७५ साहित्यकृतीचे प्रकारांतर - कादंबरी ते चित्रपट - डॉ. चंद्रकांत बावनकुळे, सिताबर्डी, नागपूर -- २९८

७६ मराठी विज्ञान साहित्यातील बदलते समाज जीवन
- डॉ. वंदना लव्हाळे, मुक्ताईनगर, जि. जळगाव. ------------------------ ३०१

७७ प्रसार माध्यमे आणि समाज परिवर्तन - डॉ. स्वाती कापाळे, अळकुटी, ता. पारनेर, जि. अहमदनगर ३०५

७८ जनसंचार माध्यमों का सामाजिक सरोकार - डॉ. संतोष रायबोले, फोंडाघाट, जि. सिंधुदुर्ग ----- ३०८

७९ साहित्य और सिनेमा
- डॉ. सुनिल एम. पाटील, शिरपूर, जि. धुलिया. ------------------------ ३११

८० समाजावर सोशल मिडीयाचा प्रभाव व परिणाम
- डॉ. सुनिल अ. पाटील, दहिवेल, ता. साक्री, जि. धुळे -------------------- ३१४

८१ संस्कृती पर जनसंचार माध्यमोंका प्रभाव और परिणाम
- प्राजक्ता देशमुख, औरंगाबाद ------------------------------------ ३१८

८२ माध्यमिक स्तरावर अध्ययन अध्यापन करताना चित्रपटांच्या माध्यमातून अध्ययन अनुभूती
- डॉ. सारिका बहिरट, पुणे ------------------------------------ ३२२

८३ प्रसार माध्यमे आणि रोजगार - डॉ. संतोष दळवी, पिंपळगाव, ता. निफाड, जि. नाशिक ------ ३२५

८४ रूपांतरित नाटकांचे संहितालेखन आणि वाङ्मयीन सर्जनशीलता- डॉ. संगिता खुरद, नागपूर --- ३२९

८५ साहित्य आणि संस्कृती यांचा कलाकृतीतील परस्पर संबंध व संवर्धन
- प्रा. रामचंद्र माळीच, दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे. ---------------------- ३३४

८६ ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास
- १) डॉ. हेमकांत अहिरराव, जळगाव, २) प्राचार्य डॉ. संजय शिंदे, नंदुरबार ---------- ३३८

८७ माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये दूरदर्शन कार्यक्रमातून विविध कौशल्य वाढविण्यासाठी होणारा उपयोग - एक अभ्यास - डॉ. वैशाली सूर्यवंशी, नाशिक ---------------------- ३४२

८८ जनसंचार माध्यम और सामाजिक सरोकार
- डॉ. सुगंधा घरपणकर, महागाव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर ------------------ ३४५

८९ हिमांशु जोशी की कहानियों में बदलता सामाजिक परिदृश्य
- डॉ. रविंद्र सोर, डोंगर कठोरा, ता. यावल, जि. जलगाव ---------------------- ३४८

९० साहित्य, समाज, संस्कृति एवं जनसंचार माध्यम - प्रा. कारा पृथ्वी, विशाखापट्टणम -------- ३५२




Scanned with OKEN Scanner

ISSN No. 2394-5990

# प्रसार माध्यमे आणि समाज परिवर्तन

प्रा. श्रीमती स्वाती रमेश फापाळे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी.
ता. पारनेर, जि. अहमदनगर
मो.नं.९५६१८०८७४७

**प्रस्तावना :**

माणूस जसा समाजशील प्राणी आहे तसाच तो संवाद प्रिय, जिज्ञासू प्राणी आहे. आपल्या सभोवतालच्या समाजात जे काही घडते त्याबद्दलचे कुतूहल त्याच्या मनात सतत जागी असते. प्रारंभी काही मर्यादित क्षेत्र असलेल्या या प्रसार माध्यमांचा आज सर्वत्र विस्तार झालेला आहे. अत्याधुनिक नवतंत्रज्ञानाच्या आणि माहिती विस्फोटाच्या युगात प्रसारमाध्यमांनी जगावर अधिराज्य निर्माण केले आहे. मराठी प्रसार माध्यमांचा पूर्व इतिहास पाहता प्राचीन काळी राजाकडून पिटली जाणारी दवंडी, नगारा, नौबत वाजवून दिल्या जाणाऱ्या सूचना ही प्रसार माध्यमांची मूळ रूपे म्हटली जातात. मध्ययुगात संत व शाहिरांनी आपले विचार लोकांपर्यंत पोहोचवून उद्बोधन व मनोरंजन करताना लोककलांचा, साहित्य प्रकारांचा वापर केलेला दिसतो. आधुनिक काळात तंत्रज्ञानात्मक प्रगतीतून प्रसारमाध्यमांचे स्वरूप,प्रेरणा व ध्येयही बदलले. त्यामुळेच जे व्ही विला नीलम यांनी जनसंवाद हे आधुनिक तंत्रज्ञानाचे व विज्ञानाचे उत्पादन आहे असे मत मांडले.

२०व्या शतकाच्या अखेरीस अंक राशीय व संगणक पद्धतीचा परिचय आणि प्रसारमाध्यम तंत्रज्ञानाचे विलीनीकरण यामुळे प्रसारमाध्यम क्षेत्रात प्रचंड बदल घडून आले. मानवी संपर्क प्रेरणा ते वैश्विक संपर्क अशी प्रसार माध्यमांची वाटचाल म्हणजे विविध शोध व सुधारणा शास्त्रीय तत्त्वे व नवतंत्रज्ञान जगाच्या विविध भागातील अनेकांचे कार्य यातून घडलेली एक लांबच प्रक्रिया आहे. भाषा व भाषेतील शब्द तेच असले तरी वापराचे क्षेत्र हेतू व आशियानुसार अनेक पर्यायी शब्दातून योग्य शब्दांची निवड प्रसारमाध्यमांसाठी लेखन व काम करणाऱ्यांनी करावयाची असते.

साहित्य भाषा संस्कृतीचे वहन तसेच प्रचार प्रसार यांचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे कि ली पॉल हा टांझानियाचा सोशल मीडिया स्टार आपल्या ओठावर हिंदी गाणी खेळवत प्रसिद्धीच्या झोतात आला. या व्यक्तीचे आज जगभरात हजारो चाहते बनले आहे ना कोणती भाषा अवगत केली ना कोणत्या देशात जाऊन प्रशिक्षण घेतले तरीही भारतीय भाषिक गाणी ही व्यक्ती अभिनयासहित आपल्यासमोर आणते त्याची संस्कृती व पेहराव आपणही याच माध्यमांद्वारे बघू शकलो. हीच खरी ताकद प्रसार माध्यमांची आहे. संस्कृती व साहित्य यांचे वहन हे तंत्रज्ञानाच्या आविष्कार असलेल्या प्रसारमाध्यमांद्वारे प्रचंड वेगाने होत आहे. प्रसार माध्यमे ही जनमत बनविण्याचे एक प्रभावी माध्यम. लोकशाहीचा आधारस्तंभ सामान्य जनतेला आपली मते मांडण्यासाठी चे व्यासपीठ जगातील माहिती आपल्या घरापर्यंत आणणारा माहितीचा प्रचंड जनशक्ती असलेल्या या प्रसारमाध्यमांची खरी शक्ती आहे. ती कमीत कमी वेळात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्याची अफाट सामर्थ्य या प्रसार माध्यमाकडे आहे या प्रसार माध्यमांचा वापर लोक कल्याणासाठी वापर करण्याची सुज्ञता असावी लागते.

भाषा म्हणजे केवळ शब्द नसून मनातील भाव समोरच्यापर्यंत पोहोचविण्याचे माध्यम होय स्वातंत्र्य पूर्वीच्या कालखंडात जुलमी इंग्रजी राजवटी विरुद्ध भारतीयांच्या मनात राष्ट्रवादाची भावना निर्माण व्हावी आणि सर्व भारतीयांनी एक होऊन परकीय सत्तेची हकलपट्टी करावी या हेतूने तत्कालीन समाज सुधारकांनी देशभक्तांनी आपल्या लेखणीचा वापर केला आणि जनतेपर्यंत संदेश पोहोचविण्यासाठी वृत्तपत्रांची निर्मिती केली त्यावेळी वृत्तपत्र हे एकमेव प्रसार माध्यम असे सशक्त प्रसार माध्यम होते. आकाशवाणी हे भारताचे सर्वात मोठे प्रसारणाचे माध्यम आहे त्यानंतर दूरदर्शन हे प्रसारमाध्यमही प्रचंड लोकप्रिय झाले सध्या तंत्रज्ञानाच्या युगात माहितीचे आणि संदेशाचे वहन इतके जलद गतीने होत आहे की एका मिनिटापूर्वी काय घडले याची माहिती दुसऱ्यात सेकंदाला ट्विटर फेसबुक टेलीग्राम व्हाट्सअप सारख्या सोशल साइटवर प्रसारित होते आज रोजी वृत्तपत्रे आणि इतर सर्वच प्रसार माध्यमांचे मोठी जीवघेणी स्पर्धा आहे परंतु बदलत्या युगातही आणि इलेक्ट्रॉनिक्स मीडियाच्या विळख्यात असून देखील वृत्तपत्रांनी आपले अपरिहार्यत्व सिद्ध केलेले आहे केवळ बातमी पुरविणे किंवा मनोरंजन घडविण्यापलीकडेही प्रसारमाध्यमांचा हेतू असला पाहिजे बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' या पहिल्या

वृत्तपत्राने वृत्तपत्र या प्रसार माध्यमाची पहिली पताका हाती घेतली आणि तत्कालीन समाजाची सांस्कृतिक सामाजिक आणि प्रबोधनाची गरज भागवली.

जगाच्या कानाकोपऱ्यात प्रत्येक सेकंदाला अनेक घटना प्रसंग हे घडत असतात साहित्य हे समाज जीवनाचा आरसा आहे असे म्हटले जाते याचे मुख्य कारण विचारात घेतले तर आपल्या असे लक्षात येते की समाजात ज्या राजकीय सामाजिक धार्मिक आर्थिक सांस्कृतिक शैक्षणिक अध्यात्मिक इत्यादी स्वरूपाच्या विविध स्तरावर घडामोडी घडतात पडसाद मुख्य भूमिका जर कोणी भावत असेल तर ते साहित्य होय मग ते साहित्य पारंपारिक संपर्क माध्यम म्हणून कार्यरत असो वा आधुनिक. मनोरंजनाचे सर्वात जुने स्वस्त आणि सहज उपलब्ध होणारे माध्यम म्हणजे नभोवाणी होय नभोवाणी हे प्रसारमाध्यम अत्यंत प्रभावशाली मौखिक माध्यम असल्याने समाजाच्या सर्व स्तरावरील लोक त्याचा आवडीने आस्वाद घेतात डॉ. महालक्ष्मी मोराळे लिहितात की 'आकाशवाणी हे अतिशय जलद माध्यम असल्यामुळे आकाशवाणीवरून सावधपणे जबाबदारीने बातम्या द्याव्या लागतात'.जातीय दंगली वेगवेगळ्या आंदोलने हिंसक घटना अपघात नैसर्गिक आपत्ती अशाप्रसंगी लोक हळवे आणि प्रक्षुब्ध झालेले असतात गतिमानता हे आकाशवाणीच्या बातम्यांचे सर्वात प्रमुख वैशिष्ट्य आहे. गतिमानता हा आजच्या जगाचे मुख्य सूत्र आहे.

दूरचित्रवाणी हे दृकश्राव्य माध्यम असल्यामुळे घरबसल्या ध्वनी आणि चित्र दाखविणारे हे माध्यम सर्वसामान्यांपासून ते असामान्य पर्यंत सर्वांचेच पहिले पसंती माध्यम ठरले मागील अनेक वर्षापासून भारतातील चित्रपट उद्योग आणि त्यांच्याशी निगडित इतर तांत्रिक माध्यमांचा झपाट्याने विकास होत आहे दिवसेंदिवस लोकांच्या आवडीनिवडी मध्ये मुलाग्रह बदल होत आहे आज मितीला भारत हा सर्वाधिक चित्रपट निर्मिती करणारा देश आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला चित्रपट क्षेत्रात करिअर करण्याच्या संधी मिळावी त्यातील वेगवेगळ्या प्रकारांमध्ये आणि विभागामुळे अपेक्षित संधी मिळावी याच हेतूने अभ्यास मंडळांनी या अनिवार्य विषयासाठी सदर घटकाची निवड केली असे निश्चित सांगता येईल. मराठी भाषिक संज्ञापन कौशल्य आत्मसात करणे आणि त्याची स्वजीवनात व स्व समाजात अंमलबजावणी करणे ही बदलत्या काळाची गरज आहे त्या दृष्टीने कोणतीही भाषा आणि तिचे व्यक्तिमत्त्व विकासामध्ये असणारे स्थान हे खूप महत्त्वाचे असून परस्पर पूरक आहे माध्यमिक ही माहितीच्या प्रसाराबरोबरच भाषेचाही प्रसार करीत असतात माध्यमिक समाजाचा आरसा आहे भाषेच्या माध्यमातून समाज जीवनाचे प्रबोधन करण्याचे काम मनोरंजन करण्याचे काम नवनवीन माहिती देण्याचे काम प्रसारमाध्यमे करीत असतात. सर्व प्रसार माध्यमे भाषेच्या कौशल्यावर उभी आहेत. १८५० पासून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात जे जे विचार प्रवाह निर्माण झाले त्यांचे खंडन मंडन करण्याच्या प्रयत्नामध्ये मराठी नियतकालिकांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली सुरुवातीच्या काळात प्रसारमाध्यमांतून सुप्रसिद्ध नामवंत त्या त्या विषयातील तज्ञ मंडळींनाच व्यक्त होण्याची संधी मिळत असे परंतु आता परिस्थिती पूर्णपणे बदललेली आहे सर्वसामान्य तळागाळातल्या कष्टकरी सर्वांसाठी व्यासपीठ खुले झाले आहे.

व्यक्ती आणि समाज यांची मानसिक गुंतवणूक या विविध प्रसार माध्यमांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेली दिसते सर्व प्रसार माध्यमांनी जागतिक पातळीवर आपली अपरिहार्यता स्पष्ट केली आहे या सर्व माध्यमांचा समाज मनावर मोठ्या प्रमाणात परिणाम होत असलेला दिसून येतो मराठीचे ट्विटर विश्व अधिकाधिक फुलावे आणि मराठीत रोज एक लक्ष ट्वीट्स लिहिल्या जाव्यात या ध्येयातूनच ट्विटर संमेलन कल्पनेची निर्मिती झाली. अशा वेगवेगळ्या प्रसारमाध्यमांमधून समाज मनावर सकारात्मक बदल घडून आलेले दिसून येतात. प्रसारमाध्यमे ही व्यक्तिमत्त्वाचा आरसा तयार करीत असतात. काय लिहावे ,काय वाचावे ,व काय प्रसारित करावे या सर्व गोष्टींचे आकलन प्रसारमाध्यमातूनच होत आहे.

**समारोप :**

चांगल्या कलाकृतीमध्ये मानवी मनाला उन्नत करण्याचे सामर्थ्य असते. कला ही विज्ञानाप्रमाणे ज्ञान देत नसली तरीही ती वास्तवाचे जीवनाचे माणुसकीच्या अर्थाचे आकलन व्यक्त करते. प्रसार माध्यमांचा परिणाम हा समाजावर चांगल्या प्रकारचे बदल घडवून आणतो आहे त्याचबरोबर गतिमानतेचे सूत्र समाज अवलंबू लागला आहे. प्रसार माध्यमांचा वापर सकारात्मक व्हावा व समाजात बदल घडून यावा हाच मुख्य उद्देश आहे परंतु थोडे अंशी त्याचा गैरवापर करतानाही लोक दिसत आहे ज्ञानाची कक्षा रुंदावण्यासाठी प्रसार माध्यमांचा उपयोग होतो . माहितीचे प्रसारण काही सेकंदात केले जाते. माहिती प्रसारित करीत असताना काही दक्षता ही घेतल्या पाहिजे अन्यथा त्याचे

ISSN No. 2394-5990

दुष्परिणाम ही भोगावे लागतात प्रसार माध्यमे ही दुधारी तलवारी सारखी आहे याचा योग्य वापर केला तर फायदा आहे अन्यथा त्याच्या आहारी जाऊन अयोग्य वापर केल्यास आयुष्याची वाट लागायला ही वेळ लागणार नाही.

**संदर्भ :**


१) प्रसार माध्यमांचे परिणाम : विकिपीडिया

२) आधुनिक भारतीय भाषा मराठी : डॉ गीतांजली चिने, डॉ हरेश शेळके

३) प्रसार माध्यमे आणि मराठी : डॉ उज्वला भोर

४) उपयोजित मराठी : डॉ संदीप माळी


●●●

West Khandesh Bhagini Seva Mandal's

# Arts, Commerce and B. C. A. College for Women, Deopur, Dhule (M.S.)

(Affiliated to S.N.D.T. Women's University, Mumbai - 20)

NAAC Re-Accredeted Grade B+

ONE DAY MULTIDISCIPLINARY - DEC 02/2022

## NATIONAL SEMINAR

ON

" साहित्य, समाज, संस्कृति एवं जनसंचार माध्यम "

" साहित्य, समाज, संस्कृती आणि प्रसारमाध्यमे"

Certified that /Prof./Dr./ प्रा. श्रीमती स्वाती रमेश फापाळे

College कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोले जि. अहमदनगर has attended / presented a paper / chaired a session One Day National Seminar on 02 Dec. 2022

He / She has presented a paper on प्रसार माध्यमे आणि समाजपरिवर्तन

Prof. Rajendra Brahmne
HOD Dept. of Hindi

Dr. Vinod Uparwat
HOD Dept. of Marathi

Dr. Dilip Z. Chaudhari
Principal

Smt. Smita A. Ajmera
President

RNI No.MAHMAR 44528:30/03/2014

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

## विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या दुर्मिळ ग्रंथांची यादी

☎: (०२५६२) २३३८४८

| अ.न. | पुस्तकाचे नांव | किंमत रुपये |
|---|---|---|
| १) | छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे | ३५० |
| २) | शिवाजीची राजनिति | ४५० |
| ३) | राजवाडे चरित्र | ७०० |
| ४) | इ.वि.का.राजवाडे समग्र साहित्य (खंड ४ ते १०) ३५० × ६ | २१०० |
| ५) | मराठ्यांच्या इतिहासाची साधने (खंड १ ते ११) ४०० × ११ | ४४०० |
| ६) | The Sources of Maratha History ५ खंड ६०० × ५ | ३००० |
| ७) | गीताई धर्मसार | ५० |
| ८) | जागतिक बालक वर्षानिमित्त | २५ |
| ९) | अमृतानुभव | १०० |
| १०) | कॅटलॉग | ५० |
| ११) | नागपुरकर भोसल्यांचे चिटणीशी बयान् | ५० |
| १२) | संशोधक-काँग्रेस शताब्दी विशेषांक | ५० |
| १३) | ज्ञानेश्वर नितीकथा | २० |
| १४) | कमाविसदार | ४०० |
| १५) | योगचिंतामणी | १०० |
| १६) | वेडिया नागेश | २५ |
| १७) | नवरस रागमाला (संशोधक) | ५० |
| १८) | तात्या जोगाच्या चरित्राची साधने | १०० |
| १९) | मोडीलीपी परिचय | २०० |
| २०) | खानदेश माळव्याच्या इतिहासाची साधने | १५० |
| २१) | दुर्मिळ संच (संशोधक) | ३००० |
| २२) | निरुक्त | २००० |
| २३) | नागपूर राज्याच्या इतिहासाची साधने | २५० |
| २४) | मराठाकालीन शासन व्यवस्था आणि स्थित्यंतरे | १५० |